जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०६/२०२३
## दि.२२/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४२४/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | नरेश चौधरी वय,३५ वर्षे रा.चित्रा चौक,येरवडा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०६/२०२३ रोजी १३/३० वा.चे सुमा बिल्डींग बी ४, तिसरा मजला,अक्षय अपार्टमेंट,मच्छीमार्केट,चित्रा चौक,येरवडा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने ३,५१,०००/- व मोबाईल ५,०००/- रुपये किंमतीचा असा एकुण ३,५६,०००/- रुपये किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९८२३५५६७१३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १९६/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७ मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अमेय पंतवैदय,वय ३९ वर्षे रा.बावधन,पुणे |
| **आरोपीत** | टॅंकरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०६/२०२३ रोजी १५/१५ वा.सिग्नीफाय कंपनी,ए.पी.८१ येथील एबीसी रोडवर,मुंढवा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मित्र कृष्णकुमार एस.वय ३९ वर्षे,रा.बी ३ राधीका विहार,केसनंद गाव रोड,वाघोली पुणे हा दुचाकीवरुन जात असताना,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टॅंकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार कृष्णकुमार एस. यांस डावे बाजुने दुचाकीस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.आर.काटे ९९२३३६०९६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४२३/२०२३,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४२ वर्षे रा.मुंजाबा वस्ती,धानोरी पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/२०१४ पासुन ते दि.०३/०६/२०२३ रोजीचे कालावधीत स.न.१४,नानाई नगर,राम मंदिर, येरवडा, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची भाची,वय १७ वर्षे हिस वर नमुद इसम तीचे वडील व तीची सावत्र आई यांनी शारिरीक व मानसिक त्रास देवुन मारहाण करीत असलेने त्यांचे त्रासाला कंटाळुन,तीस धावत्या रेल्वे मधुन उडी मारुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. (सदरचा गुन्हा हा दौंड लो.पो.ठाणे ACR NO.६६/२०२३, भादवि कलम ३०६,३४ अन्वये दाखल करून येरवडा पोलीस ठाणे येथे वर्ग करणेत आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विशाल पाटील ९७६६७६४४७१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १८८/२०२३,भादविक ३८५,३३६,३३७,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २८ वर्षे रा.बोपोडी,पुणे |
| **आरोपीत** | किशोर उत्तम गायकवाड,वय १९ वर्ष,रा.स.नं.२४ कमलाबाई,बहिरट चाळ बोपोडी,पुणे (अटक) त्याचे इतर दोन साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०६/२०२३ रोजी १९/३० वा. गोल्डन चौक,बोपोडी,पुणे येथे असलेल्या बेकरी मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे व त्यांचा भाऊ याचेसह त्यांचे बेकरीत हजर असताना,नमुद इसमांनी फिर्यादी यांचे बेकरीवर येवुन आपसात भांडणे करुन,फिर्यादी यांचे भावास शिवीगाळ करुन हा आमचा चौक आहे. आम्ही येथील भाई आहे,तुला जर नीट बेकरी धंदा चालवायचा असेल तर,आम्हाला हप्ता दयावा लागेल असे म्हणाले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना हप्ता देण्यास नकार दिल्यावर त्याने बेकरी फोडण्याची धमकी देवुन, दहशत करण्याच्या उद्देशाने रस्त्यावरील दगड फिर्यादी यांच्या कानावर फेकुन मारुन जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे बेकरीवर दगडफेक करून,सदर परिसरात दहशत निमार्ण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वैभव मगदुम ९१७५९०२८०८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९१३/२०२३,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक जेष्ठ नागरीक,वय ७१ वर्षे,रा.फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०६/२०२३ रोजी पहाटे ०२/०० ते ०३/३० वा.चे दरम्यान महादेव मंदिर,फुरसुंगी गाव,ता.हवेली, जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे फुरसुंगी गाव येथील महादेव मंदिराच्या मंडळाचे अध्यक्ष म्हणुन कामकाज पाहतात. यातील नमुद इसमांनी मंदिराचे गाभा-यात प्रवेश करून,महादेव मंदिराचे गाभा-या समोर ठेवलेली लाकडी दानपेटी व त्यातील रोख २०,०००/- रुपये दानपेटीसह चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार एस.एस.जाधव ९६६५५५०७८९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९१२/२०२३,भादविक ३७९,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | अमोल देवकर,वय २७ वर्षे, रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०६/२०२३ रोजी पहाटे ०४/०० ते ०४/४५ वा.चे दरम्यान जय शंभो पेट्रोल पंप,हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी पेट्रोल पंपावर कॅशिअर म्हणुन नोकरी करीत आहेत. नमुद इसम याने जबरदस्तीने त्याचे मोटार सायकलची पेट्रोलची टाकी पेट्रोलने पुर्ण भरुन घेवुन,पंपावरील मशीनची तोडफोड करुन,पंपा जवळ पार्क केलेल्या गाड्यांचे काचा फोडुन,त्याचे नुकसान करुन,कार मधील रोख रक्कम १,०००/- रुपयेची चोरी करुन,पेट्रोल भरलेले पैसे न देता निघुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुशिल डमरे ८८८८८५७४२४ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ४०२/२०२३,भादविक ३७९,५११,३४,भारतीय विदयुत कायदा २००३ कलम १३८ |
| **फिर्यादी** | शैलेश गढे,वय ५६ वर्षे रा.वारजे पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०६/२०२२ रोजी १४/२० वा.चे दरम्यान एनसीएल कॅम्पस,पाषाण पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी एनसीएल कॅम्पस,पाषाण,पुणे येथे वरिष्ठ प्रधान वैज्ञानिक म्हणुन काम पाहत असुन,नमुद इसम यांनी ऑफिसचे कॅम्पस मध्ये असलेले महावितरणच्या २२ के.व्ही. जीके-१ च्या लाईनची छेडछाड करुन त्याचे नुकसान केलेले आहे . |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, दुशिंग ९४०३५७२५७२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**